प्रेसनोट दि. ०९/१२/२०१७.

## अल्पवयीन मुलीला लग्नाचे अमिष दाखवुन जम्मु कश्मिर वरुन पळवुन आणणा-या झारखंड मधील गुन्हेगारास गुन्हे शाखा,युनिट ५ पुणे शहर यांनी केले जेरबंद.

डी.एच.पुरा कुलगाव जम्मु-कश्मिर राज्य पो.स्टे. गु.र.नं.१२५/२०१७ भा.दं.वि.कलम-३६३ मधील अल्पवयीन मुलगी हीस आरोपी नामे- रोशनलाल नाबुमियॉ अन्सारी वय-२२ वर्षे रा. झारखंड याने लग्नाचे अमिष दाखवुन पुलवामा जि.अनंतनाग जम्मु-काश्मिर येथुन पळवुन नेले बाबत वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे. दाखल गुन्हयातील अल्पवयीन मुलगी व तिचा प्रियकर हे त्यास माहिती असलेल्या महाराष्ट्रातील वेगवेगळया ठिकाणी रेल्वेने, बसने प्रवास करुन पुणे येथे आले होते.

सदरबाबत माहिती मिळाल्याने डी.एच.पुरा कुलगाव पो.स्टे. यांनी मा.पोलीस आयुक्त सो पुणे शहर यांना भेटुन पोलीस मदत मिळणेबाबत विनंती केली होती. त्याप्रमाणे मा.समिर शेख सहाय्यक पोलीस आयुक्त-१ गुन्हे शाखा पुणे शहर यांनी आदेशित केल्याने गुन्हे शाखा, युनिट-५ चे प्रभारी दत्ता चव्हाण यांनी त्यांचे कडील स्टाफ व डी.एच.पुरा कुलगाव पो.स्टे.जम्मु-कश्मिर कडील स्टाफ असे संयुक्तरित्या सदर आरोपी व मुलीचा शोध घेत असताना ते वारंवार त्यांची ठिकाणे बदलत होते.त्यामुळे त्यांचा नक्की पत्ता मिळुन येत नव्हता. यातील आरोपीने त्यास पैशाची गरज असलेने पैसे पाहिजे असलेने त्याचे एका मित्रास ससाणेनगर हडपसर पुणे येथे बोलावुन घेतले होते. त्यावरुन सदरचे आरोपीचा माग काढुन शिताफीने सापळा लावुन आरोपी नामे- रोशनलाल नाबुमियॉ अन्सारी वय-२२ वर्षे रा.ग्राम बसजोरा पोस्ट करंजो थाना-मार्गोमुंडा देवधर झारखंड व पीडीत मुलगी यांना ससाणेनगर हडपसर पुणे येथुन ताब्यात घेतले. त्याचेकडे कौशल्याने तपास करुन यातील पिडीत मुलगी हिस ससाणेनगर,हडपसर पुणे येथुन ताब्यात घेतले असुन सदरच्या आरोपीस दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे. तसेच यातील आरोपी याची मा.न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. यातील अल्पवयीन मुलीस संरक्षणाकामी मुलींचे निरीक्षण गृह, येथे ठेवण्यात आले आहे.

सदरची कामगिरी ही श्री. प्रदिप देशपांडे सो. अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री. पंकज डहाणे पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. मा.समिर शेख सहाय्यक पोलीस आयुक्त-१ गुन्हे शाखा पुणे शहर, श्री. संजय निकम, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट -५, पुणे कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.दत्तात्रय चव्हाण, पोलीस निरीक्षक शकुर सय्यद, पो.उप-निरी. अकिल शेख, पोलीस हवालदार संतोष मोहिते, प्रविण शिंदे, मेहबुब मोकाशी, सिध्दाराम कोळी, पोलीस नाईक प्रविण काळभोर, अमजद पठाण, अंकुश जोगदंडे, म.पो.हवा. ननिता येळे यांनी केली आहे.